ISSN 2231-573X
UGC Care Listed Journal

# तिफण

वर्ष : १५ वे । अंक : दुसरा
एप्रिल ते जून : २०२४

## भाषा, साहित्य आणि संस्कृती विशेषांक



# अनुक्रमणिका


| अ. क्र. | संशोधन पेपरचे नाव | संशोधकाचे नाव | पान क्र. |
|---|---|---|---|
| १ | साहित्यातील सामाजिकता | प्रा. डॉ. अनिल बळीराम बांगर | ९ |
| २ | साहित्य, समाज आणि संस्कृती | प्रा. डॉ. विलास अण्णाराव गाजरे | १७ |
| ३ | स्वातंत्र्योत्तर कालखंडातील स्त्रियांच्या कादंबरीतील सामाजिकता | प्रा. डॉ. जयकुमार चंदनशिवे | २२ |
| ४ | साहित्य, समाज आणि संस्कृती : सहसंबंध | प्रा. सागर अशोक पाटील | २६ |
| ५ | साहित्य, समाज आणि संस्कृती यांचा अनुबंध | प्रा. डॉ. सोनू धोंडू लांडे | ३४ |
| ६ | साहित्य, समाज आणि संस्कृती यांचा सहसंबध | प्रा. रंजना ज्योतिराम महाजन | ४० |
| ७ | साहित्य, संस्कृती आणि राजकारण | डॉ. गजानन विठ्ठलराव भोसले | ४६ |
| ८ | साहित्य, समाज आणि शिक्षण संस्कृती | डॉ. कल्याण गोपनर | ५४ |
| ९ | साहित्य आणि संस्कृती : सहसंबंध | डॉ. सी. डी. कांबळे | ६१ |
| १० | समाज, साहित्य आणि संस्कृती यांचा अनुबंध | प्रा. मिलिंद शत्रुघ्न ठोकळे | ६७ |
| ११ | विविध वाड्मयीन प्रवाह आणि संस्कृती | वर्षा वैजिनाथ घाडगे | ७१ |
| १२ | शालिवाहन शक आणि कथा सरित्सागराचे महत्त्व | प्रा. पूनम बबन तडके | ७८ |
| १३ | ग्रामीण साहित्यातील समाजजीवन | डॉ. बबन सिद्राम गायकवाड | ८२ |
| १४ | लोकसाहित्य आणि संस्कृती | प्रा. रामचंद्र उत्तम ढवळे | ८६ |
| १५ | विविध वाड्मयीन प्रवाह आणि संस्कृती | लता खापरे (जाणे) | ९१ |
| १६ | लोकसाहित्याचे अंग : लोकगीत | प्रा. डॉ. राजू शंकर शनवार | ९९ |
| १७ | लोकसाहित्य आणि संस्कृती प्रचार प्रसार | नवसो परब | १०४ |

# साहित्यातील सामाजिकता

प्रा. डॉ. अनिल बळीराम बांगर

*कोणत्याही साहित्यकृतीची निर्मिती प्रारंभी वैयक्तिक अभिव्यक्ती म्हणून प्रकट होत असली तरी तिची परिणती सामाजिक जाणिवेत झाल्याशिवाय ती पूर्ण होत नसते. साहित्य आणि समाज यांचा परस्परसंबंध अनेकांगी ठरतो. या अंगाचा सांगोपांग विचार केल्याशिवाय साहित्यविचाराला परिपूर्णता लाभणार नाही.*

## प्रास्ताविक

साहित्याची निर्मिती विशिष्ट स्थलकालबद्ध अशा सामाजिक, सांस्कृतिक आणि वाङ्मयीन वातावरणात होत असल्याने साहित्याचा समाज आणि संस्कृतीशी संबंध येतो. साहित्यात सामाजिक सांस्कृतिक स्थितीगती, वास्तव, विचारप्रणाली मूल्यव्यवस्थांचे चित्रण केले जाते. साहित्यगत प्रतिमित सामाजिक सांस्कृतिक वास्तव हे प्रत्यक्षगत सामाजिक सांस्कृतिक व्यवस्थेशी प्रत्यक्षाप्रत्यक्ष अटळ नाते असते. या अंगाने साहित्याचा समाज संस्कृतीशी संबंध येतो. साहित्य हे वाचक आणि समाज मनावर काही एक संस्कार, परिणाम करीत असते. ते सौंदर्यात्मक आनंद देते. नैतिक व ज्ञानात्मक संस्कार करते. समाज व संस्कृतीच्या जडणघडणीत सहभागी होत असते,तसेच समाज साहित्यावर परिणाम करीत असतो. या परिणामाच्या अंगाने साहित्याचा समाज संस्कृतीशी संबंध येत असतो.

साहित्य आणि समाज यांचा अन्योन्य संबंध आहे. साहित्य जीवन निरपेक्ष असू शकत नाही. “कोणतेही साहित्य म्हणजे जीवनातील त्रिवेणी संगमच. साहित्यिकाचे स्वतःचे जीवन, त्याच्या समाजाचे जीवन व मानवी जीवन या तीन प्रवाहांच्या

संगमातूनच ललित वाङ्मयाचा जन्म होत असतो." व्यक्ती जशी समाजात वावरते तसाच कलावंत हा देखील समाजात वावरत असतो. त्यामुळे कलावंतावर सामाजिक व सांस्कृतिक वातावरण कळत व नकळत प्रभाव टाकत असते. हा प्रभाव अटळ असतो.

जीवन हा साहित्याचा विषय आणि भाषा हे साहित्याचे माध्यम आहे. जीवन व भाषा या दोन्ही गोष्टी समाजाधिष्ठित आहेत. प्रत्येक समाजाजवळ एक संस्कृतीचा ठेवा असतो जो भाषेच्या माध्यमातून साहित्याद्वारे प्रकट होतो. शिवाय 'साहित्य' हे वाचक, श्रोते वा प्रेक्षक यांच्याकरीता निर्माण होते. 'साहित्यिक' हा देखील समाजाचाच एक घटक असतो. साहित्यनिर्मीतीने त्याला समाधान/आनंद प्राप्त होतो. या सर्वच गोष्टीत साहित्याचा समाजाशी असलेला संबंधच दिसून येतो. साहित्य हे. समूहमनाच्या अंत:स्तरावरचे विनिमयाचे साधन असल्याने त्यामध्ये सामाजिक संदर्भ आपोआपच असतात.सामाजिक संदर्भाचे प्रत्यक्ष अप्रत्यक्षरित्या साहित्यनिर्मितीवर तिच्या गर्भावस्थेपासूनच परिणाम होत असतात.

साहित्य आणि समाज यांचा परस्पर संबंध दाखवणारी. अनेक विधाने नेहमीच केली जातात. उदा.'साहित्य समाज जीवनाचा आरसा आहे', 'साहित्य ही एक सामाजिक संस्था आहे', 'समाज साहित्याची प्रेरक शक्ती आहे', 'कवी हा त्याचा काळ निर्माण करतो' वगैरे. कलावंत हा समाजाचा एक घटक असतो म्हणून साहित्य ही मानवनिर्मित कला आहे. लेखक ज्या समाजात जीवन जगतो त्या समाजातील अनुभवाचे तो निवेदन करतो. समाजातच साहित्याचा आस्वाद घेतला जातो. मानवी जीवन ही साहित्याची कच्ची सामुग्री आहे. माणूस हा समाजशील प्राणी आहे,समाजात साहित्यामुळे त्याला मनुष्यत्वाचे गुणधर्म प्राप्त होत असतात.हा संदर्भ मानवनिर्मित कलेशी संबंधित असतो. यामधून साहित्य-समाज आणि संस्कृती यांच्या संबंधाचे स्वरूप कसे आहे हे पाहणे आवश्यक आहे.

## साहित्य, समाज व संस्कृती

कला, समाज आणि संस्कृती यांच्या अभ्यासाचे 'साहित्य' हे महत्त्वाचे माध्यम आहे तर साहित्य, समाज, आणि संस्कृती यांचे अत्यंत घनिष्ट संबंध असून ते परस्परांना पूरक असतात. ''साहित्यनिर्मीती हा मानवाच्या सामाजिक जीवनातील सांस्कृतिक उपक्रम आहे, तसाच तो संस्कृतीचा एक घटकही आहे. विवाह संस्थेपासून राज्यसंस्थेपर्यत सर्व सामाजिक संस्था, या संस्थाच्या लिखीत अलिखीत नियमातून निर्माण झालेल्या चालीरीती, रूढी परंपरा आणि रिवाज तसेच कला आणि साहित्य हे संस्कृतीचे चार घटक आहेत. या चार घटकांनी मिळून 'संस्कृती' ही लघुसंज्ञा परिचीत झालेली आहे. पुष्कळदा 'संस्कृती' आणि 'समाज' असे म्हणतो तेव्हा आपल्याला 'लोकांचे वर्तन' अभिप्रेत असते. समाज हा ओळखता येण्यासारखा 'लोकसमुदाय' असतो. तो आदिम समाज, भटका विमुक्त समाज, खेडयातील कृषिजीवनाशी निगडीत ग्रामीण समाज अथवा आधुनिक समाज असेल पण 'समाज' म्हणजे एकाअर्थी 'परिमित लोकांची संस्था'च असते. आणि संस्कृती म्हणजे विविक्षीत 'लोकसमुदायाच्या अथवा समाजाच्या जीवनाची विवक्षित पध्दती असते. या जीवनपध्दतीत कला आणि साहित्य यांना अविभाज्य आणि अपरिहार्य असे स्थान आहे.'' (सदा कऱ्हाडे).

साहित्यकृतीची निर्मिती ही लेखकाची व्यक्तीनिष्ठ निर्मिती असली तरी त्याला त्याच्या समाजजीवनातून आणि सांस्कृतिक वातावरणातून साहित्याच्या निर्मितीच्या प्रेरणा व स्त्रोत मिळत असतात. साहित्य, समाज आणि संस्कृतीचा अनेक तत्त्ववेत्यांनी. विचारवंतांनी उहापोह केला आहे. त्यातून साहित्याच्या समाजशास्त्रीय अभ्यासाची तत्वप्रणाली विकसित

झाली आहे.

भालचंद्र नेमाडे, 'साहित्याचा अर्थ केवळ 'लिहिलेले' असा न घेता साहित्य म्हणजे 'वाचलेले' हा घेतला तर साहित्य प्रक्रियेचे अधिक व्यापक सामाजिक कार्य लक्षात येते'[१]

म.सु.पाटील,' कोणत्याही साहित्यकृतीचा निर्मिती, संदर्भ, लेखकाचा वर्तमान असतो. त्याच्या भोवतालची सामाजिक, सांस्कृतिक परिस्थिती, त्याला निर्मितीसाठी उद्युक्त करते, त्या दृष्टीने कोणतीही साहित्यकृतीही तत्कालीन, सामाजिक, सांस्कृतिक संदर्भाने परिवेष्टित असते'[२]

दिगंबर पाध्ये.'कलावस्तूचा निर्माता, कलावंत कलावस्तूचा आस्वादक रसिक साहित्यकृतीतून व्यक्त होणारा आशय आणि ज्या भाषेद्वारे कलावस्तू निर्माण होते ती भाषा हे सर्व विशिष्ट समाजाचेच भाग असतात. साहित्याच्या स्वरुपामुळे साहित्याला सामाजिक अंग प्राप्त होणे अपरिहार्य असते'[३]

गं.बा. सरदार "मनुष्याच्या वैयक्तिक व सामाजिक जीवनातील अंत:प्रवाहाचा साकल्याने वेध घेण्याचे सामर्थ्य साहित्याच्या ठिकाणी असते. साहित्याचे स्वरूप केवळ छायात्मक नाही. कोणत्याही समाजाच्या साहित्यात त्याची संस्कृती प्रतिबिंबित झालेली असते. संस्कृतीचे संगोपन,संवर्धन. नवीनीकरण व प्रसार,प्रज्ञावंत आणि प्रतिभासंपन्न लेखक साहित्याच्या माध्यमातून काही प्रमाणात करू शकतात.'[४]

स.दा.क-हाडे,'सामाजिक संबंध मानवी संबंधात परावर्तित होतात आणि मानवी संबंध साहित्यात परावर्तित होतात. म्हणून साहित्यातील मानवी संबंधांचा अन्वयार्थ सामाजिक संबंधाचा अन्वयार्थ लावता येतो.'[५]

कार्ल मार्क्स "साहित्य हे समाजाच्या इतिहासाच्या अभ्यासाचे साधन असते.'[६]

या विचारवंतां शिवाय लालजी पेंडसे, के रं शिरवाडकर, दि.के बेडेकर, संत तुकाराम, रामदास. एगल्स आदिंनी साहित्य आणि समाज यांचा अन्योन्य संबंध स्पष्ट केला आहे.

**साहित्याची सामाजिकता**

कोणत्याही साहित्यकृतीची निर्मिती प्रारंभी वैयक्तिक अभिव्यक्ती म्हणून प्रकट होत असली तरी तिची परिणती सामाजिक जाणिवेत झाल्याशिवाय ती पूर्ण होत नसते. साहित्य आणि समाज यांचा परस्परसंबंध अनेकांगी ठरतो. या अंगाचा सांगोपांग विचार केल्याशिवाय साहित्यविचाराला परिपूर्णता लाभणार नाही. म्हणूनच साहित्याचा सामाजिक दृष्टीने अभ्यास करताना खालील घटक महत्त्वाचे आहेत.

साहित्याचा निर्माता, साहित्यकृती आणि वाचकाची सामाजिकता.

**लेखकाची सामाजिकता**

लेखक म्हणजे साहित्य निर्मिती करण्याची क्षमता असणारी व्यक्ती. लेखक प्रतिभावंत असला तरी तो समाजाचा घटक असतो. फरक इतकाच असतो की सामान्य माणसापेक्षा तो अधिक संवेदनशील असतो. व्यक्ती व समाज यांच्या संदर्भातील सर्व प्रश्न लेखकाच्या बाबतीतही उपस्थित करता येतात. व्यक्ती एकटी येते आणि एकटी जाते. स्वतःचे दुःख भोगावे लागत असतात असे म्हटले जात असले तरी व्यक्तीचे जगात येणे आणि जाणे या घटना सामाजिक असतात. व्यक्तीच्या सर्व सुख दु:खांना साहित्यातून व्यक्त होणाऱ्या जीवनाशयाचा सामाजिकतेशी अपरिहार्य संबंध असतो. प्रदेश भाषा,संस्कृती यानुसार त्या त्या साहित्यात काही वैशिष्ट्ये असतात.

साहित्याचा निर्माता असणारी व्यक्ती (लेखक) व तिची सामाजिकता या प्रश्नाची सोडवणूक साध्या सरळ नियमांनी करता येत नाही. साहित्यकृती ही प्रतिभावंत असणा-या व्यक्तीची निर्मिती असली तरी ती विशिष्ट समाजाचा घटक असते. म्हणून व्यक्ती व समाज यांच्या

संदर्भातील सर्व प्रश्न लेखकाच्या संदर्भात उपस्थित होतात. व्यक्तीचे जन्माला येणे. त्याचे सुखदुःख भोग स्वतःसंबंधीचे निर्णय एकटयालाच घ्यावे लागत असले तरी या सर्व गोष्टींना कमी अधिक प्रमाणात सामाजिक परिमाण असते.हे नाकारता येणार नाही. व्यक्ती आणि समाज यांच्यातील नात्याची रहस्य. व्यक्तीचे एकटेपण आणि तिची सामाजिकता यांच्यातील गुढ संबंधातच शोधता येईल.

लेखकज्यासमाजातजन्मालायेतोत्यासमाजाच्या परंपरा धर्मकल्पना, रूढी,तत्वप्रणाली,आचारविचार, संकेत शिष्टाचार म्हणजे एकंदर जीवन प्रणाली असते. तसेच समाज अंतर्गत विविध समाजगट असतात आणि समाज गटानुसार जीवन पद्धतीत विविधता असू शकते. आर्थिक स्तर जाती जमातीनुसार ह्या जीवन पद्धती भिन्नता आढळते. लेखक एक व्यक्ती म्हणून कोणत्याही समाजगटात वाढत असताना त्या समाजघटकाच्या जीवन पद्धतीतील अनेक घटकांनी त्याच्या मनाचे पोषण केलेले असते. त्याच्या जडणघडणीला त्या समाजगटाच्या जीवन पद्धतीचा स्पर्श असतो. दलित ग्रामीण, आदिवासी, भटक्या विमुक्तांच्या साहित्याचा विचार करताना ही बाब विशेष लक्षात घ्यावी लागते. म्हणून लेखकाच्या जडणघडणीत या विविध घटकांनी कसा आणि कितपत हातभार लावला हे लक्षात घेऊनच लेखकाचे, लेखकाच्या व्यक्तिमत्त्वातील सामाजिक अंगाचा शोध घेणे शक्य आहे.

लेखकाच्या सामाजिकतेच्या संदर्भात त्याच्या साहित्यकृतीतून व्यक्त होणारी मूल्यव्यवस्थाही लक्षात घ्यावी लागते. लेखकाच्या व्यक्तिमत्त्वाची जडणघडण होत असताना ते पारंपरिक संस्काराचा मूल्यव्यवस्थेचा, वा कल्पनेचा स्वीकार नकार करेल. या स्वीकार नकारामागे सामाजिक वास्तवाचा आधार असेल. उदा.रोमॅंटिक आंदोलनाच्या परिणामातून जागतिक वाङ्मयात प्रादेशिक वैशिष्ट्यपूर्ण प्रकार अस्तित्वात आले. किंवा डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांच्या प्रेरणेने विचाराने प्रभावित झालेला दलित समाज आपल्या व्यथा वेदना साहित्यातून अभिव्यक्त करू लागला. हे करतानाचे परंपरागत साहित्य व्यवस्था. समीक्षा यांना नकार देते. व त्याचबरोबर त्यासंबंधीचा प्रक्षोभ व्यक्त करते. या त्यांच्या नकार विद्रोह मागे फुले आंबेडकरी. आंबेडकरी. विचारधारा स्वतःच्या अस्मितेची जाणीव स्वातंत्र्योत्तर कालखंडात अस्तित्वात आलेली नवी समाजव्यवस्था शिक्षणातून वाणी आणि लेखणीने. गो असलेले स्वातंत्र्य त्यासंबंधीची नवी मानवतावादाची जाणीवही घटक सामाजिक आहेत. लेखकाच्या संदर्भात या गोष्टी लक्षात घेताना त्याच्या साहित्य कृतीतून व्यक्त होणारी मूल्यव्यवस्था, लेखकाच्या सामाजिक तेजीदर्शक असते असे म्हणता येईल.

साहित्याविषयीचा. समाजातील संकेतांचाही. लेखकाच्या जडणघडणीवर. प्रत्यक्ष अप्रत्यक्ष परिणाम होतो. लेखक वापरीत असलेली भाषा. रूपके,प्रतीके इत्यादी समाजातूनच मिळतात. त्या भाषेतील प्रायोगिकतेलाही अनेक सामाजिक संदर्भ असतात. थोडक्यात लेखकाच्या व्यक्तिमत्त्वाची जडणघडण, त्यांची साहित्यविषयक भूमिका व त्याची साहित्यनिर्मिती समाजसापेक्ष असतात. तसेच लेखकाला समाजात मिळणारी मानमान्यता व उपेक्षा अवहेलना या साऱ्यांचा संबंध सामाजिकतेशी असतो.

**वाचकांची सामाजिकता**

साहित्य हा समाजाच्या जडणघडणीतील व विचारप्रक्रियेतील महत्त्वाचा घटक आहे. आजच्या स्पर्धेच्या, बाजारीकरणाच्या व अनिश्चिततेच्या वातावरणात स्वतःच्या मूल्यव्यवस्थेबाबत सजगपणे विचार करणे, समष्टीशी स्वतःला जोडून घेणे व त्याआधारे विवेकी व कृतिशील समाजनिर्मिती करणे या व्यापक सामाजिक उद्दिष्टांच्या पूर्ततेत साहित्य अत्यंत महत्त्वाची भूमिका बजाबत असते. सामाजिक

अंगाने केलेला साहित्यविचार म्हणूनच अत्यंत महत्त्वाचा ठरतो.

साहित्य व समाज यांच्या परस्परसंबंधाचा विचार ही गेल्या दीडदोन शतकात विकसित झालेली ज्ञानशाखा आहे. हा अभ्यास एका अर्थाने सांस्कृतिक अभ्यासाचाच (cultural studies) स्वतंत्र विभाग आहे. किंबहुना साहित्यकृतीचा समाजाशी, पर्यायाने संस्कृतीशी व अंतिमतः कल्पनाप्रणालीशी संबंध असतो.

लेखकाची साहित्यकृती वाचका वाचून व्यर्थ आहे. लेखक स्वतःसाठी लिहीत असला तरी कलाकृती वाचकापर्यंत जावी अशी त्याची इच्छा असते. वाचिक आणि साहित्यकृती वाचलीच नाही तर लेखकाची साहित्यकृती समाजापासून दूर राहील. वाचका एक समाजाचा घटक असतो. त्यामुळे साहित्याने समाज यांच्याप्रमाणेच लेखक आणि वाचक या दोन घटकांचा संबंध अतूट असतो. वाचक ज्या समाजात वावरत असतो त्या समाजातील परंपरा, संस्कार, आचार, धर्म, समाज व्यवस्था यातून तो घडत असतो.

साहित्यकृतीतून व्यक्त होणाऱ्या जीवनाशयाला नेहमीच  सामाजिक संदर्भ असतो. लेखक ज्या समाजात वाढतो त्या समाजाची जीवनपद्धती हेच बहुतांशी त्याच्या कलात्मक अनुभवाचे संदर्भक्षेत्र ठरत असते. साहित्यात येणारे विषय, मानवी जीवनविषयक प्रश्न, मानवी जीवनाविषयीच्या कल्पना नीतिमूल्यं ही सर्व त्या संदर्भाक्षेत्राशी निगडीत असतात. साठोत्तरी मराठी साहित्यक्षेत्रातील विषयात कोणते मराठी प्रवाह निर्माण झाली. जीवनाची कोणकोणती क्षेत्रे साहित्यात प्रतिबिंबित झाली या साऱ्याची तपशीलवार नोंद केली तर साहित्यात प्रकट होणारा जीवनाशयाचा सामाजिकतेशी असणारा संबंध सहज जाण्यास जाण्यासारखा आहे. साहित्यात व्यक्त होणार् या जीवनात जीवनात मक व सामाजिक वास्तवाचा संबंध नेहमी बिंबप्रतिबिंबात्मक असतो. असे नाही. अनेकदा लेखक आपल्या भोवतालच्या सामाजिक वास्तवास प्रतिसाद देत असताना लेखक उदात्तीकरण, विडंबन इत्यादींसारख्या पद्धतीचा अवलंब करतो. त्यामुळे जीवनाचे व सामाजिक वास्तवाचे संबंध गुंतागुंतीचे होतात. अशा वेळी लेखकाने नेमके काय केले आहे हे लक्षात घेतले वाचून. त्यातीलसंबंध समजणे अवघड असते म्हणून अभ्यासका जवळ साहित्य समजून घेण्याची क्षमता असल्याशिवाय प्रक्षेपित सामाजिकता लक्षात येऊ शकत नाही. थोडक्यात सामाजिकता प्रतिबिंबित असो की अप्रक्षेपित साहित्यातून व्यक्त होणाऱ्या जीवनाशी याचा सामाजिकतेशी अपरिहार्य संबंध असतो. प्रदेश,भाषा,संस्कृती यानुसार त्याच्या साहित्यात काही वैशिष्ट्ये येत असतात. त्याचे कारण हेच.

### साहित्याचा समाजावरील व समाजाचा साहित्यावरील परिणाम

साहित्य आणि समाज यांच्यातील परस्परसंबंध. परिणाम प्रभाव याविषयीची चर्चा पुरातन काळापासून होत आलेली आहे.समाजशास्त्रीय भूमिकेवरून साहित्याची पद्धतशीर मांडणी करण्याचा पहिला मान फ्रेंच समीक्षक तेन यांच्याकडे जातो.इ.स.१८६३ मध्ये त्यांने"A History of English Literature" या नावाचा ग्रंथ लिहिला.इ.स.१८७१ मध्ये या ग्रंथाचे इंग्रजी भाषांतर झाली. तीन चा या ग्रंथाने समाजशास्त्रीय समीक्षेचा पाया घातला

तेच्या मते साहित्यसमीक्षेचे कार्य. भोवतालच्या. परिस्थितीचा आणि साहित्याचा. अनोन्यसंबंध स्पष्ट करणे हे असते. शिवाय या ग्रंथाच्या प्रस्तावनेत त्याने साहित्यकृतीहीवू शकाल व परिवेश यांची निर्मिती असल्याचे म्हटले आहे. तीनच्या तीन घटकांमध्ये. कार्ल मार्क्स. आणि एंजेल्स यांनी एका नव्या घटकाची भर टाकली ते म्हणजे आर्थिक घटक. इथूनच

समाजशास्त्रीय समीक्षेला एक नवे वळण लागले.

साहित्याची समाज संबंधितता हा तीनचा साहित्यविषयक सिद्धांताचा गाव आहे. त्यांच्यामध्ये कोणतीही साहित्यकृती घेतली तर ती केवळ कल्पनांचा खेळ किंवा उद्दीपित मेंदूतून निघालेली क्षणिक लहर असत नाही. तो लिहिणारा साहित्यिक. समाजात वावरतो त्या समाजाचा, त्या देशाचा इतिहास, भूगोल, संस्कृतीचा तो लेखक ज्या काळात जगला त्या काळातील योग धर्माचा एकसमयाच्छेदेकरून त्यांचा साहित्यकृतीवर परिणाम होत असतो आणि या सर्व घटकांचे परिशीलन केल्यानंतर त्या कलाकृतीचे सर्वांगाने आकलन होऊ शकते.

साहित्य आणि समाज यांचा एकमेकांच्या प्रभावाचे विश्लेषण करणारी शास्त्रीय पद्धत तेनने 'History of English Literature' या ग्रंथाच्या प्रस्तावनेमध्ये मांडली. तेनच्या मते साहित्य हे वंश(Race), युगप्रवृत्ती (Moment). आणि परिस्थिती (Miliue) या तीन घटकांच्या परिणामातून निर्माण होत असते.

**वंश (Race)**

इंग्रजी साहित्याचा अभ्यास करताना तेनी. वंश या घटकाला फारच महत्त्व दिली आहे. वैश्या कंपनीचे तीनचे स्पष्टीकरण पाहिले तर. त्यामध्ये. एखाद्या मानवसमूहाला जन्मजात व वारसा म्हणून प्राप्त झालेली वैशिष्ट्ये. स्वभावधर्म. शरीर, रचना इत्यादीचा समावेश असतो. माणसे वेगवेगळ्या परिस्थितीत जगत असली तरी त्यांच्यावर मूलभूत साचाच्या काही खुणा असतात. म्हणजे सर्वसामान्यपणे राष्ट्रीय स्वभाव असे जन आपण म्हणतो तें तेंला अभिप्रेत आहे. विशिष्ट प्रदेशातील वंशातील व योगदानातील व्यक्तीची. करण्याची पद्धती, त्यांचे मनोविकार हे विशिष्ट प्रकारचे असतात. हे लक्षात घेऊनतेने व ऊस ही कल्पना मांडली. आहे.

**काळ/युगप्रवृत्ती (Moment)**

प्रत्येक युगामध्ये. काही प्रभावी कल्पना असतात. तसेच शतकानुशतके टिकून राहण्याची क्षमता असणारे काही बौद्धिक बंद असतात असे त्यांचे मत आहे. या अर्थाने माणसाविषयीची काही संकल्पनात्मक भूमिका असणार् या कालखंडाला उद्देशून योग प्रवृत्ती म्हणता येईल. तसेच योग प्रवृत्ती या कल्पनेत वाङ्मयीन. परंपराही समाविष्ट करणे शक्य आहे. आपल्याला प्राप्त झालेल्या वाङ्मयीन परंपरेचे लेखक काय करतो? हे साहित्य आणि समाज यांच्यातील परस्पर संबंधाच्या दृष्टीने महत्वाचे आहे. वांग परंपरेचे महत्त्व जाणणारा तीन हा पहिला तत्त्वज्ञ आहे. परंतु वांग परंपरेकडे. तीनने विशेष लक्ष पुरविलेले दिसत नाही.

व्यक्ती कोणत्या काळात जन्माला आली व वाढली याचा त्याच्या विचार करण्याच्या प्रक्रियेवर परिणाम होत असतो.अर्थात काळाचा परिणाम हा वातावरणावर अवलंबून असतो यादव कालीन समाज, मोगलकालीन समाज, ब्रिटिशकालीन समाज एका विशिष्ट पद्धतीचा विचाराने प्रभावित होता. मराठ्यांच्या काळातत्यामुळेच. पोवाडय़ाच्या. रचना प्रकारातून शूर मर्दाचे गुणगान आढळते.

**वातावरण/परिस्थिती (Miliue)**

यात. त्या त्या देशातील निर्मिती. मध्य माणसा परंपरांचा जीवनशैलीचा अंतर्भाव होतो. माध्यमांची विशिष्ट उपलब्ध आणि साहित्यनिर्मिती परस्पराश्रयी असतात. असे तीन म्हणतो. परिस्थिती या घटकाकडे? तीननी अधिक लक्ष दिले आहे. तीन चा. परिस्थिती या संकल्पनेत. विशिष्ट प्रदेशाचे हवामान. तेतील भूगोल यासारख्या बाबीना महत्त्वाचे स्थान असलेली दिसते.

भोवतालची. भौतिक व सामाजिक वस्तुस्थिती माणसाची शारीरिक व मानसिक जडणघडण करण्यास कारणीभूत होते व त्या विशिष्ट पर्यावरणामुळे विशिष्ट दिशेने त्याची प्रकृति प्रवृत्ती घडते. उदाहरणार्थ, प्राचीन

मध्ययुगीन व आधुनिक मानवा वातावरणाशी निगडित कल्पना आहेत.

**कार्ल मार्क्सचा सिध्दांत**

**साहित्य आणि समाज यांच्या संबंधी मार्क्सवादी विचार :** साहित्यातील सामाजिकतेचा. शोध घेणारी ही दुसरी पद्धती आहे. याला मार्क् सवादी पद्धती असे म्हणतात. मार्क्सवादी भूमिकेनुसार. समाजातील. उत्पादनसंबंध. हा कोणत्याही समाजाचा पाया असतो, त्याला पूरक अशी नैतिक, धार्मिक, राजकीय. विचार प्रणालीची प्रती रचना उभी राहत असते. साहित्य हे याच रचनाचा भाग असते. त्यामुळे साहित्यातील सामाजिकतेचा शोध घेताना. उत्पादन संबंधाचे स्वरूप आणि लेखकाची वर्गीय लक्षणी यांना महत्त्व प्राप्त होते. या पद्धतीनुसार. विशिष्ट काळातील उत्पादनसंबंध. लेखकाचा वर्ग यांच्याद्वारे. साहित्यातील जीवनाशयाचा समाजाशी संबंध जोडला जातो.

समाजातील उत्पादनामध्ये बदल झाला की साहित्यच्या स्वरूपात कसा बदल होतो हे या पद्धतीने सांगता येत. प्राचीन काळी. समाजरचना शेतीप्रधान होती. च्या समाजरचनेला अनुकूल अशी धार्मिक नैतिक विचार प्रणाली समाजात होती. परिणामी धर्मप्रधान असे साहित्य या काळात निर्माण झाली. इंग्रज राजवटीमुळे हे उत्पादन संबंध बदलले. औद्योगिकतेकडे वाटचाल सुरू झाली. एकूणच मराठी साहित्य यह वाढ झाली. दुसऱ्या महायुद्धाच्या काळात मर्ढेकरांसारखे कवी ,गंगाधर गाडगीळ यांच्यासारखे कथाकार साहित्यातून औद्योगिकरण, माणसाची कोंडी अस्वस्थता यांचे वर्णन करू लागली. साहित्यातून व्यक्त होणारा आशय हा वर्गीय असतो असे मार्क्स म्हणतो.

**निष्कर्ष:-**

समाज, संस्कृती आणि वाड्मय यांच्यातील संबंध अतूट असल्याने त्यांचा परस्परांवर प्रभाव पडत असतो. समाजात परिवर्तन घडू लागले की, वाड्मयातही त्याचे पडसाद स्वाभाविकपणे उमटतात आणि त्यातही परिवर्तन घडून येते. याच दृष्टीने आपल्याला असे म्हणता येते की, सामाजिक, सांस्कृतिक चळवळी आणि वाड्मय यांचा परपस्परावंर प्रभाव पडत असतो.मराठी साहित्य बाराव्या शतकापासून निर्माण झालेले असले आणि आपल्या साहित्याच्या या परंपरेचा आजच्या साहित्याशी व साहित्यविषयक वातावरणाशी संबंध असला तरी मराठी साहित्याच्या संदर्भात प्राचीन, अर्वाचीन हा भेद फार महत्वाचा आहे. या अर्वाचीन कालखंडात मराठी समाजाचा पाश्चात्य संस्कृतीशी जो संबंध आला त्या संबंधाचेच आपल्या आजच्या साहित्य संस्कृतीशी अधिक प्रभावी नाते असलेले आढळते.

वरील सर्व विवेचनावरून असा निष्कर्ष निघतो की, 'साहित्य' हे समाज आणि संस्कृतीच्या प्रभावातून निर्माण होणारी एक कला आहे. साहित्याचा अनुबंध राष्ट्र, जात, धर्म, वंश, प्रदेश इत्यादी दृष्टीने तपासला असता त्यातून समाजाचे व संस्कृतीचे प्रतिबिंब अनुभवता येते. साहित्याची भाषा ही दलित, ग्रामीण, अभिजात, आदिवासी इ. दृष्टीने आधुनिक काळात बोलीरूप झालेली दिसते. त्यामुळे या सर्व साहित्यातून त्या-त्या बोलीच्या परंपरा, लोकतत्त्व आणि त्या-त्या समाज संस्कृतीचा आलेखच स्पष्ट होतो.

**संदर्भ ग्रंथ**


१. नेमाडे भालचंद्र,-'टीकाविवेक', साकेत प्रकाशन प्रा. लि. औरंगाबाद, दु, आ. २००१. पृ.क्र. १०३ २.

२. पाटील म. सु. -'साहित्याचे सामाजिक व सांस्कृतिक अनुबंध', शब्दालय प्रकाशन, श्रीरामपूर, २००१. पृ. क्र. २८.

३. पाध्ये दिगंबर -'साहित्य, समाज आणि

संस्कृती`, प्रकाश विश्वासराव, न्यू एज प्रिटिंग प्रेस, जुलै १९९८, पृ. क्र. २.
४. सरदार गं. बा. प्रस्तावना - 'मराठी साहित्यः प्रेरणा व स्वरूप' पॉप्युलर प्रकाशन, मुंबई.
५. कऱ्हाडे सदा, 'साहित्य आणि समाज', लोकवाङ्मयगृह, मुंबई- २००७, पृ.क्र. ३७. पब्लिशर्स, पुणे.
६. तत्रैव, पृ.क्र. ५.
७. कर्वे इरावती - 'मराठी लोकांची संस्कृती', देशमुख आणि कं. पुणे.

✿

**- प्रा. डॉ. अनिल बळीराम बांगर**
मराठी विभाग प्रमुख
को.ए.सो. लक्ष्मी-शालिनी
महिला महाविद्यालय-पेझारी,
ता. अलिबाग, जि. रायगड
मो. ९०२८०९२१११

✿✿✿